महाराष्ट्र शासन

सुशिबेन शाह
अध्यक्षा

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग**
**(संसद यांनी कायद्याने स्थापलेले मंडळ)**
३ रा मजला, शासकीय परिवहनसेवा इमारत,
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
Telephone No. 022-24920894/95/97
email : mscpcr@gmail.com, website : mscpcr.egov.co.in

मराबाहसंआ/२०२२-२३/ ४८८
दि.१४.०७.२०२२

प्रति,
संपादक,
न्युज १८ लोकमत

**विषय** - Pregnancy Tips - मुलगा होण्याची लक्षणे नेमकी कोणती असतात? या आशयाची बातमी प्रसिध्द केल्याबाबत

**संदर्भ** - News 18 Lokmat या फेसबुक पेज व वृत्त वाहिनीच्या अधिकृत वेबपेजवर दि.१३.०७.२०२२ रोजी प्रसिध्द झालेली बातमी

उपरोक्त विषयाबाबत आपले News 18 Lokmat या फेसबुक पेज व वृत्त वाहिनीच्या अधिकृत वेबपेजवर दि.१३.०७.२०२२ रोजी Pregnancy Tips - मुलगा होण्याची लक्षणे नेमकी कोणती असतात? अश्या आशयाची बातमी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या बातमीमुळे आपण गरोदर मातेस मुलगा होणार की मुलगी याबाबत एक प्रकारे बेकायदेशीर मार्गदर्शन करत आहात, असे दिसून येत आहे. सदर बातमीचे छायाचित्र पत्रासोबत पाठवण्यात येत आहे.

अशा प्रकरची बातमी प्रसिध्द केल्यामुळे गर्भलिंग निदान याबाबत जनसामान्यांमध्ये चुकीचे संकेत जाण्याची शक्यता आहे. तसेच PCPNDT ACT 1994 नुसार कायद्याचे उल्लंघन करीत आहात. तरी या बातमीच्या अनुषंगाने आपण सदर मजकुर आपल्या फेसबुक पेज व वेबपेज वरून तात्काळ काढावा. तसेच आपला खुलासा आयोगास त्वरीत सादर करावा.

(सुशिबेन शाह),
अध्यक्षा
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner